**प्रेसनोट दि.३०/०५/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर.**

**जळीत पीएमपीएमएल बस मधील ड्रायव्हर यांस प्रसंगावधानाने जीव वाचवलेबाबत..**

दि.३०/०५/२०१९ रोजी रात्रौ ०१.४० वा चे सुमारास रात्रगस्तीकरीता असलेले पोलीस उप-निरीक्षक संदिप चव्हाण, पोलीस हवालदार सुनिल वाघवले हे शिवाजी पुलावर पेट्रोलिंग करीत असतांना शिवाजी पुलाचे खाली मोठा आवाज झाल्याने ते लागलीचा शिवाजी पुलाचे खाली येऊन पाहणी केले असता शिवाजी पुलाखाली सुलभ शौचालया जवळ पीएमपीएमएल बस क्रं.एम.एच.१४.सी.डब्लू.१६६४ ही शौचालयाचे भिंतीवर आदळून अपघात झाल्याचे दिसून आल्याने पोलीस उप-निरीक्षक संदिप चव्हाण व पो.हवा. सुनिल वाघवले यांनी लागलीच बसची पाहणी केली असता सदर बसमध्ये चालकाचे शिटवर बसलेल्या इसमाचे पोटात अपघातामुळे बसची स्टेअरींग दबल्यामुळे त्यास बाहेर पडता येत नसल्याने सदर ठिकाणी असलेल्या पीएमपीएमएलचे इतर कर्मचारी यांच्या मदतीने सदर इसमास बाहेर काढले तसेच पाठीमागे बाजूस असलेल्या इसमास बाहेर येण्यास सांगितले. त्याच दरम्यान बसच्या समोरील भागातून इंजिनच्या खालच्या बाजूने अचानक धुर निघू लागला व क्षणातच बसच्या समोरील बाजूस असलेल्या इंजिनला आग लागली. त्यामुळे पीएमपीएमएल बस स्थानकावरील असलेल्या फायर एक्स्टिंगविशरने आग विझवण्याचा प्रयत्न केला असता आग जास्त प्रमाणात भडकली. आग जास्त प्रमाणात असल्याने लागलीच पोलीस ठाणेकडील सहायक पोलीस फौजदार पांडे पोलीस नाईक योगेश रेंगडे, पो.शि. विजय मोरे, पो.शि. अमोल कोल्हे, पो.शि. जगदीश ठाकरे यांना बोलावून घेऊन लागलीच सदर ठिकाणचे वाहने बाजूला करुन घेऊन वाहतूक नियंत्रणाचे काम केले. त्या दरम्यान फायर ब्रिगेडची गाडी सदर ठिकाणी येऊन त्यांनी आगीवर तात्काळ नियंत्रण मिळवले त्यामुळे मोठा अनर्थ घडलेला नाही.

पीएमपीएमएल बसचे ड्रायव्हर यांना त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव नितीन सौदागर सावंत रा. रचना पुष्प कॉलनी, १६१ थेरगाव पुणे व बसमध्ये पाठीमागे बसलेला इसम नामे हर्षल दत्तात्रय शिंदे रा. वारजे माळवाडी शिंदे पुल दांगट इस्टेट पुणे असे नाव पत्ता असल्याचे सांगून त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी मंगला टॉकीज समोरील रस्त्यावरुन मनपा इमारतीसमोर बस पार्क करण्यासाठी घेऊन जात असतांना बसचे ब्रेक व हॅन्डब्रेक लागला नसल्याने बस सुलभ शौचालयाच्या भिंतीला जाऊन आदळलेली आहे अशी हकीकत सांगितली. आगीवर नियंत्रण मिळविल्यानंतर बसमधील जखमी झालेल्या दोन इसमांना औषधोपचारासाठी ससून हॉस्पिटल येथे पाठविण्यात आलेले आहे.

पोलीस उप-निरीक्षक संदिप चव्हाण, पो.हवा. सुनिल वाघवले, सहायक पोलीस फौजदार पांडे, पोलीस नाईक योगेश रेंगडे, पो.शि. विजय मोरे, पो.शि. अमोल कोल्हे, पो.शि. जगदीश ठाकरे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन अपघातग्रस्त बसमधील चालक नितीन सौदागर यांस तातडीने बसमधून बाहेर काढून त्यांचा जीव वाचवलेला आहे.

**( बाळासाहेब कोपनर )**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर**

